# Mumbai Metro 2A and 7 Sets New Daily Ridership Record Exceeding 200,000 Passengers. Registers Impressive 5% Monthly Growth since Phase 2 Launch

Mumbai, 28th June 2023.

Maha Mumbai Metro, the city's first metro network has achieved a remarkable milestone by surpassing 200,000 daily commuters. This record-breaking figure marks the highest number of passengers since the launch of Mumbai Metro 2A and 7.

Phase 1 of metro lines 2A & 7 was inaugurated on April 2nd, 2022, and Phase 2 was officially flagged off by Honorable Prime Minister Shri Narendra Modi on January 19, 2023, establishing Mumbai's first integrated metro network. From January 20th, 2023 to June 27th, 2023, the total ridership reached 2,44,16,775, while the ridership from April 2nd, 2022 to June 27th, 2023, stands at 3,33,81,920. The highest number of commuters in a single day reached an impressive 2,03,581.

The overwhelming response from Mumbaikars towards the metro has been commendable. To ensure a seamless journey for our passengers, even during the monsoon season, Mumbai Metro has introduced a Monsoon Control Room, to make sure an uninterrupted service even in heavy rainfall.

Mumbai Metro remains committed to providing uninterrupted and efficient services to its passengers. We express our gratitude to all our commuters and look forward to achieving more milestones together in the near future.

***"This achievement of surpassing 200,000 daily ridership is a testament to our dedication towards delivering a superior transportation experience for the people of Mumbai. We will continue to work towards further improving our services and meeting the evolving needs of our passengers. We understand the importance of providing reliable and efficient transportation services, especially during challenging weather conditions. Our commitment to ensuring a smooth and convenient journey for commuters is reflected in our preparedness to run extra services during heavy rainfall."**
Said, Dr. Sanjay Mukherjee, IAS, Metropolitan Commissioner, MMRDA & CMD, MMMOCL.

# मुंबई मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या आता २ लाखांच्या पार

# पावसाळ्यातही न थांबता धावणाऱ्या मुंबई मेट्रोला मुंबईकरांची पसंती

# टप्पा २ च्या लोकार्पणानंतर प्रवासी संख्येत दर महिन्याला सरासरी ५% वाढ

मुंबई, २८ जून, २०२३

मुंबई मेट्रोने प्रवासी संख्येचा एक महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे. मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्येनं २ लाखांचा आकडा पार केला आहे.  आतापर्यंतची हि सर्वाधिक दैनंदिन प्रवासी संख्या आहे.पावसाळ्यातही न थांबता धावणाऱ्या मेट्रोमार्ग २अ आणि मेट्रो मार्ग ७ वर  मंगळवारी २ लाख, ३ हजार, ५८१ मुंबईकरांनी प्रवास केला.

मेट्रोमार्ग २अ आणि मेट्रो मार्ग ७ कार्यरत झाल्यापासून नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. मेट्रोची सर्वाधिक दैनंदिन संख्याही नवा उच्चांक गाठत आहे. मुंबई मेट्रोचा पहिला टप्पा सुरु झाल्यानंतर म्हणजेच २ एप्रिल २०२२ ते २७ जून २०२३ पर्यंत मेट्रो प्रवासी संख्या ३,३३,८१,९२० इतकी आहे, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण करताच मुंबई मेट्रोचं पहिलं जाळं या शहराला मिळालं आणि त्यानंतर मेट्रोच्या प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ होत आहे.  २० जानेवारी ते २७ जून २०२३ या ५ महिन्यांच्या कालावधीत २,४४,१६,७७५ प्रवाशांनी मुंबई मेट्रोनं प्रवास केला.

मुंबईकरांना अतिवृष्टीमुळे त्रास होणार नाही नाही याची काळजीही मुंबई मेट्रोनं घेतली आहे. मुंबई मेट्रो मुसळधार पावसातही विना व्यत्यय आपली सेवा सुरु राहिल याची सर्वतोपरी काळजी आधीच घेण्यत आली आहे. नागरिकांसाठी महा मुंबई मेट्रोने मान्सून कंट्रोलरूम देखील सुरु केली आहे. प्रत्येक मेट्रो स्थानकावर ६४ कॅमेरा प्रत्येक घटनेची नोंद घेत आहे.

विनाव्यत्यय किंवा सीमलेस प्रवासासाठी सुरु करण्यात आलेल्या मुंबई-१ नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड सुविधेला देखील नागरिकांनी पसंती दिली आहे . आतापर्यंत जवळपास १,१४,१७१ प्रवाशांनी मुंबई वन कार्डाचा लाभ घेतला आहे.

**"प्रदूषण विरहित, सुरक्षित आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या मेट्रोला मुंबईकरांनी नेहमीच पसंती दिली, त्याबद्दल मुंबईकरांचे आभार. महा मुंबई मेट्रोही नागरिकांच्या सेवेसाठी कायम तत्पर आहे. मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या हि आता २ लाखांच्या पार गेली आहे आणि आम्हला विश्वास आहे कि मुंबईकरांच्या अशाच उदंड प्रतिसादामुळे आम्ही असेच अनेक महत्वाचे टप्पे (माईलस्टोन) गाठत राहू. टप्पा २च्या लोकार्पणानंतर दर महिन्याला प्रवासी संख्येत सरासरी ५ % वाढ होत आहे.पावसाळ्यातही मुंबई मेट्रो सेवा अशीच अविरत सुरु राहील याकडे सातत्याने आमचं लक्ष आहे. जर अतिवृष्टीमुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्था ठप्प झाली तर अतिरिक्त मेट्रो चालवण्याची तयीरीही महा मुंबई मेट्रोनं ठेवली आहे."** असं महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच महानगर आयुक्त, एमएमआरडीए डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे म्हणाले.